८० वर्षे व त्यावरील निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतन/ कुटुंब निवृत्तिवेतनात वाढ करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : सेनिवे-२०१९/प्र.क्र.५९/सेवा-४
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ३० जुलै, २०१९

**संदर्भ :** १) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : सेनिवे-१०१४/प्र.क्र.२६/सेवा-४, दि.०९.०६.२०१४.
२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : सेनिवे-२०१९/प्र.क्र.५९/सेवा-४, दि.२४.०१.२०१९.
३) केंद्र शासनाचे ज्ञापन क्रमांक : F.No.३८/३७/०६-P&PW(A).pt.II, दि.०३.१०.२००८.

## परिपत्रक

संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये ८० वर्षे व त्यावरील राज्य शासकीय निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारकांना सहाव्या वेतन आयोगानुसार निश्चित झालेल्या मूळ निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतनात दि.०१.०४.२०१४ पासून १०% वाढ करण्यात आली आहे. तसेच संदर्भाधीन क्र.२ येथील शासन निर्णयान्वये दि.०१.०१.२०१९ पासून पुढीलप्रमाणे वाढ सुधारित करण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | वय वर्षे ८० ते ८५ | मूळ निवृत्तिवेतनात १०% वाढ |
| २ | वय वर्षे ८५ पेक्षा अधिक ते ९० | मूळ निवृत्तिवेतनात १५% वाढ |
| ३ | वय वर्षे ९० पेक्षा अधिक ते ९५ | मूळ निवृत्तिवेतनात २०% वाढ |
| ४ | वय वर्षे ९५ पेक्षा अधिक ते १०० | मूळ निवृत्तिवेतनात २५% वाढ |
| ५ | वय वर्षे १०० पेक्षा अधिक | मूळ निवृत्तिवेतनात ५०% वाढ |

२. केंद्र शासनाने संदर्भाधीन क्रमांक ३ येथील ज्ञापनानुसार केंद्र शासनातील निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारकांना ८० वर्षे वय झाल्यानंतर मंजूर करावयाचे अतिरिक्त निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतन कधीपासून मंजूर करण्यात यावे याबाबत स्पष्टीकरण दिलेले आहे. त्यास अनुसरुन राज्य शासनातील निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारक यांना ८० वर्षे वय झाल्यानंतर निवृत्तिवेतनात / कुटुंब निवृत्तिवेतनात वाढ कधीपासून लागू करावी याबाबत पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

"निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारकांना ज्या महिन्यात वयाची ८० / ८५ / ९० / ९५ / १०० वर्षे पूर्ण होतात, त्या महिन्याच्या १ तारखेपासून त्यांना वाढीव दराने निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतन अनुज्ञेय राहील."

उदा.

(१) श्री.'अ' हे राज्य शासनाचे सेवानिवृत्त कर्मचारी आहेत. (जन्म तारीख दि.५.२.१९३३, सेवानिवृत्त दि.२८.२.१९९१)

दि.१.१.२०१३ रोजी मूळ निवृत्तिवेतन रु.७६१०/- (अंदाजित)

दि.५.२.२०१३ ला वयाची ८० वर्षे पूर्ण

वित्त विभागाच्या दि.९.६.२०१४ च्या शासन निर्णयानुसार ८० वर्षे व त्यावरील निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतनात १०% वाढीव लाभ दि.१.४.२०१४ पासून अनुज्ञेय करण्यात आला आहे.

दि.१.४.२०१४ पासून रु.७६१०+रु.७६१=रु.८३७१/- (१०% नुसार अतिरिक्त निवृत्तिवेतन देय होईल.)

सातव्या वेतन आयोगानुसार निवृत्तिवेतननिश्चिती

दि.१.१.२०१६ ला मूळ निवृत्तिवेतन रु.७६१०/-

७६१० x २.५७ = १९५५८ (सातव्या वेतन आयोगानुसार दि.१.१.२०१६ पासूनचे मूळ निवृत्तिवेतन)

दि.१.१.२०१६ पासून रु.१९५५८ + रु.१९५६ = रु.२१५१४/- (१०% अतिरिक्त निवृत्तिवेतन).

दि.५.२.२०१८ रोजी वयाची ८५ वर्षे पूर्ण

दि.१.१.२०१९ पासून रु.१९५५८ + रु.२९३४/- = रु.२२४९२/- (१५% अतिरिक्त निवृत्तिवेतनाचा लाभ हा दि.१ जानेवारी २०१९ नंतरच अनुज्ञेय आहे.)

(२) श्री.'ब' हे राज्य शासनाचे सेवानिवृत्त कर्मचारी आहेत. (जन्म तारीख दि.२७.७.१९३५, सेवानिवृत्त दि.३१.७.१९९३)

दि.१.१.२०१५ रोजी मूळ निवृत्तिवेतन रु.७७५०/- (अंदाजित)

दि.२७.७.२०१५ ला वयाची ८० वर्षे पूर्ण

दि.१.७.२०१५ पासून रु.७७५०+रु.७७५=रु.८५२५/- (१०% नुसार अतिरिक्त निवृत्तिवेतन देय होईल.)

सातव्या वेतन आयोगानुसार निवृत्तिवेतननिश्चिती

दि.१.१.२०१६ ला मूळ निवृत्तिवेतन रु.७७५०/-

७७५० x २.५७ = १९९१८ (सातव्या वेतन आयोगानुसार दि.१.१.२०१६ पासूनचे मूळ निवृत्तिवेतन)

दि.१.१.२०१६ पासून रु.१९९१८ + रु.१९९२ = रु.२१९१०/-(१०% अतिरिक्त निवृत्तिवेतन देय होईल.)

३. ज्या निवृत्तिवेतनधारकांना / कुटुंबनिवृत्तिवेतनधारकांना दि.३१.१२.२०१५ रोजी वयाची ८० वर्षे पूर्ण झाल्यानंतर वित्त विभागाच्या दि.९.६.२०१४ च्या शासन निर्णयानुसार सहाव्या वेतन आयोगात निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतन १०% वाढ अनुज्ञेय करण्यात आली आहे, त्यांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतनावर देखील १ जानेवारी २०१६ ते ३१ डिसेंबर २०१८ या कालावधीत १०% वाढ अनुज्ञेय राहणार आहे. तसेच १ जानेवारी २०१६ ते दि.३१ डिसेंबर २०१८ या कालावधीत ज्या निवृत्तिवेतनधारक

/ कुटुंब निवृत्तिवेतनधारकांनी त्यांच्या वयाची ८० वर्षे पूर्ण केली आहे, त्यांना वित्त विभागाच्या दि.९.६.२०१४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार सातव्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारीत निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतनावर १०% वाढीचा लाभ अनुज्ञेय राहील.

४. शासन असाही आदेश देत आहे की, ज्यांना निवृत्तिवेतन योजना लागू केलेली आहे, अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषि विद्यापीठे, यांमधून सेवानिवृत्त झालेल्या ८० वर्षे व त्यापुढील निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारक यांना वरील निर्णय लागू राहील.

५. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधीचे इतर सर्व अधिकार याचा वापर करुन शासन असाही आदेश देत आहे की, वरील निर्णय जिल्हा परिषदांमधून सेवानिवृत्त झालेल्या ८० वर्षे व त्यापुढील निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारक यांनाही लागू राहतील.

६. ज्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांनी सरकारी क्षेत्रातील उपक्रमांमध्ये / स्वायत्त संस्थांमध्ये / स्थानिक संस्था इत्यादींमध्ये स्वत:ला सामावून घेतल्यानंतर एकरकमी ठोक रक्कम स्वीकारलेली आहे, व जे निवृत्तिवेतनाच्या १/३ इतका अंशराशीकृत भाग पुन:स्थापित करण्यासाठी तसेच शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : निअंक-१०९९/३०६/ सेवा-४, दि.१५.११.१९९९ अनुसार अंशराशीकृत रकमेच्या सुधारणेस आणि शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : निअंक-१०१०/प्र.क्र.५८/सेवा-४, दि.२६.०७.२०१० अनुसार सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारित निवृत्तिवेतनास पात्र ठरले आहेत, अशा ८० वर्षे व त्यावरील निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारकांनादेखील दि.१.१.२०१९ पासून वयमानानुसार वाढीव निवृत्तिवेतनाचा लाभ अनुज्ञेय राहील.

७. यासंबंधीचा खर्च वरील परिच्छेदात नमूद केलेल्या निवृत्तिवेतनधारकांची निवृत्तिवेतने ज्या अर्थसंकल्पीय शीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात, त्या शीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या त्या शीर्षांतर्गत मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

८. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०७३०१२५१०५४४०५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

INDRAJEET SAMBHAJI GORE

Digitally signed by INDRAJEET SAMBHAJI GORE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=6015944fe7d58a83f4a54c43147b5da1e34861e2984e9f793b66f7249aaa9c1a, postalCode=400032,
street=Y-5/65,GOVERNMENT COLONY,MUMBAI,
serialNumber=d4994742192306fcc1dea9aadd381063950651 9fa652b919767b98b04e905a18, ou=FINANCE DEPUTY SECRETARY, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA,
cn=INDRAJEET SAMBHAJI GORE
Date: 2019.07.30 13:02:15 +05'30'

**( इंद्रजित गोरे )**

**शासनाचे उप सचिव**

**प्रति,**

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
३) महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
४) महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
५) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
६) अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई.

**Increase in pension / family pension to pensioners / family pensioners of 80 years of age and above.**

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Finance Department**
**Government Circular No. : PEN- 2019/C.R. 59/SER -4**
Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Marg,
Mantralaya, Mumbai- 400 032.
Date : 30 July, 2019

**Reference :**
1) Government Resolution, Finance Department No. PEN-1014/C.R. 26/ SER-4 dated 09/06/2014.
2) Government Resolution, Finance Department No.PEN-2019/C.R. 59/ SER-4 dated 24/01/2019.
3) Government of India Office Memorandum No.F.No.38/37/08-P&PW(A). pt.II dated 03.10.2008.

**Government Circular :**

In accordance to the Government Resolution mentioned at Serial No. 1 above, pensioners / family pensioners of the age of 80 years and above, have been given 10% increase in the pension / family pension fixed as per Sixth Pay Commission w.e.f.01.04.2014. According to the Government Resolution mentioned at Serial No.2 the increase is revised from 01.01.2019 as below:

| | | |
|---|---|---|
| 1 | Age 80 to 85 years | Increase in basic pension 10% |
| 2 | Age above 85 to 90 years | Increase in basic pension 15% |
| 3 | Age above 90 to 95 years | Increase in basic pension 20% |
| 4 | Age above 95 to 100 years | Increase in basic pension 25% |
| 5 | Age above 100 years | Increase in basic pension 50% |

2. Government of India vide, Office Memorandum at Serial No. 3, has clarified about the actual admissibility of the additional quantum of pension / family pension to pensioners / family pensioners on attaining the age of 80 years. On the same line, following instructions are issued with respect to State Government pensioners / family pensioners.

"The additional quantum of pension / family pension on attaining the age of 80 / 85 / 90 / 95 / 100 years would be admissible from the 1st day of the month, in which date of birth of a pensioner / family pensioner falls."

**Example :**

(1) Shri 'A' is a retired State Government employee. (Date of Birth – 05.02.1933, Date of Retirement – 28.02.1991)

Basic Pension as on 01.01.2013 Rs.7610/- (Approx.)

Attaining age of 80 years on 05.02.2013.

According to Government Resolution, Finance Department dated 09.06.2014 pensioners / family pensioners of the age 80 years and above have been given benefit of 10% increase in the pension / family pension w.e.f. 01.04.2014.

From 01.04.2014 Rs.7610 + Rs.761 = Rs.8371 (10% increase in pension is applicable)

Fixation of Pension as per Seventh Pay Commission

Basic Pension as on 01.01.2016 Rs.7610/-

7610 x 2.57 = 19558 (Basic pension as on 01.01.2016 as per Seventh Pay Commission)

From 01.01.2016 Rs.19558 + Rs.1956 = Rs.21514/- (10% additional increase)

Attaining age of 85 years on 05.02.2018.

From 01.01.2019 Rs.19558 + Rs.2934 = Rs.22492/- (15% Increase in pension is applicable from 01.01.2019 only.)

(2) Shri 'B' is a retired State Government employee. (Date of Birth – 27.07.1935, Date of Retirement – 31.07.1993)

Basic Pension as on 01.01.2015 Rs.7750/- (Approx.)

Attaining age of 80 years on 27.07.2015.

From 01.07.2015 Rs.7750 + Rs.775 = Rs.8525 (10% increase in pension is applicable)

Fixation of Pension as per Seventh Pay Commission

Basic Pension as on 01.01.2016 Rs.7750/-

7750 x 2.57 = 19918 (Basic pension as on 01.01.2016 as per Seventh Pay Commission)

Rs.19918 + Rs.1992 = Rs.21910/- (Additional Pension applicable from 01.01.2016)

3. The pensioner / family pensioner who have been given benefit of 10% increase in pension / family pension as per Sixth Pay Commission on attaining age of 80 years on 31.12.2015, will be liable to get 10% increase in revised pension / family pension as per Seventh Pay Commission for the period between 01 January 2016 to 31 December 2018. The pensioners / family pensioners who have attained age of 80 years during the period between 01 January 2016 to 31 December 2018 will be liable to benefit of 10% increase on revised pension / family pension as per Seventh Pay Commission according the Government Resolution, Finance Department dated 09.06.2014.

4. Government is also pleased to direct that the above decision should mutatis mutandis apply with necessary changes to those pensioners / family pensioners of 80 years of age and above of Recognized and Aided Educational Institutions, Non Agriculture Universities and affiliated

Non-Governmental Colleges and Agricultural Universities, etc. to whom pension scheme is made applicable.

5. In exercise of the powers conferred by the proviso under Section 248 of Maharashtra Zilla Parishad and Panchayat Samitis Act 1961 (Maharashtra Act number Five of 1962) and of all other powers enabling it on that behalf, the Government is further pleased to decide that above decision shall apply to the pensioners / family pensioners of 80 years of age and above of Zilla Parishads.

6. The State Government Employees who opted for lump sum payment on absorption in a Public Sector Undertaking / Autonomous bodies / Local bodies and are entitled to restoration of $1/3^{rd}$ commuted portion of pension as well as revision of the restored amount in terms of Government Resolution, Finance Department No.COP-1099/306/SER-4 dated 15.11.1999 and also eligible for revised pension as per Sixth Pay Commission vide Government Resolution Finance Department No. COP-1010/CR.58/SER-4 dated 26/07/2010 shall also be entitled to the benefit of increase in pension w.e.f. 01.01.2019.

7. The expenditure on this account should be debited to the Budget Heads to which the pensions of the pensioners mentioned in the above paras are debited and should be met from the grants sanctioned thereunder.

8. This Government Circular is available on the website of Government of Maharashtra i.e. www.maharashtra.gov.in and its computer code number is 201907301251054405. This Circular has been signed digitally.

By order and in the name of Governor of Maharashtra.

INDRAJEET SAMBHAJI GORE

Digitally signed by INDRAJEET SAMBHAJI GORE DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=6015944fe7d58a83f4a54c43147b5da1e34861e2984e9f793b 66f7249aaa9c1a, postalCode=400032, street=Y-5/66,GOVERNMENT COLONY,MUMBAI, serialNumber=d4994742192306fcc1dea9aadd381063950651 9fa652b 919767b9bb04e905a18, ou=FINANCE DEPUTY SECRETARY, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=INDRAJEET SAMBHAJI GORE Date: 2019.07.30 13:02:49 +05'30'

**( Indrajeet Gore )**

**Deputy Secretary to Government**